# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 14.03.2025** **वार-शनिवार**

---

पुणे आणि परिसरात आज सर्वत्र धूलिवंदनाचा उत्साह दिसून येत आहे.

**‘रंग बरसे**

भोई प्रतिष्ठानकडून विशेष मुलांसाठी ‘रंग बरसे ‘ या कार्यक्रमाचं आयोजन आज पुण्यात करण्यात आलं होतं. यामध्ये अनाथ, एचआयव्ही बाधित, गतिमंद, दिव्यांग, रेल्वे फलटावर बूट पॉलिश करणारे, देवदासी भगिनींची मुलं, डोंबाऱ्याचा खेळ करणाऱ्या मुलांचाही सहभाग होता. केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनीदेखील यामध्ये सहभाग घेतला.

**द्राक्ष महोत्सव**

श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती मंदिराचा गाभारा आणि सभामंडप काळ्या आणि हिरव्या द्राक्षांनी सजवून द्राक्ष महोत्सव करण्यात आला. नाशिक च्या सह्याद्री फार्म कंपनीच्या शेतक-यांनी पिकवलेल्या २ हजार किलो द्राक्षांची आरास करण्यात आली. ही द्राक्ष नंतर भाविक, अनाथाश्रम, वृद्धाश्रम, ससून रुग्णालयात प्रसाद म्हणून दिली जाणार आहेत. ही आकर्षक आरास बघण्यासाठी भाविकांनी सकाळपासूनच गर्दी केली होती.

**<u>बीज सोहळा</u>**

जगतगुरु श्री संत तुकाराम महाराज यांचं सदेह वैकुंठ गमन अर्थात बीज सोहळा श्री क्षेत्र देहू मध्ये येत्या रविवारी होत आहे. या सोहळ्यासाठी राज्यभरातून येणाऱ्या लाखो भाविकांना सोयी-सुविधा देण्यासाठी देहू नगरपंचायतीकडून जय्यत तयारी केली जात आहे. यंदा त्रिशतकोत्तर अमृतमहोत्सवी बीज सोहळा आहे. त्यामुळे लाखोंच्या संख्येने येणाऱ्या भाविकांसाठी नगरपंचायत प्रशासनाकडून खबरदारी घेण्यात येत असल्याची माहिती देहू नगरपंचायतीच्या मुख्याधिकारी निवेदिता घार्गे यांनी दिली.

**<u>बीज</u>**

दरम्यान, पीएमपीएमएलतर्फे तुकाराम बीज निमित्त देहूगाव ला जाण्यासाठी 15 ते 17 मार्च दरम्यान जादा बस गाड्यांची व्यवस्था करण्यात आली आहे. स्वारगेट, पुणे महानगरपालिका भवन, निगडी, पुणे स्टेशन आणि हडपसर इथून या गाड्या सुटणार आहेत.

**<u>एचएसआरपी</u>**

राज्यात १ एप्रिल २०१९ पूर्वीच्या सर्व वाहनांसाठी 'उच्च सुरक्षा क्रमांक पाटी' बसवणं बंधनकारक करण्यात आलं आहे. पुणे शहरात ६९ केंद्र सुरु होती मात्र त्यातली दोन केंद्र अचानक बंद पडल्यामुळे नागरिकांची तारांबळ उडाली आहे. वाहनधारकांना होणारा त्रास टाळण्यासाठी 'एचएसआरपी' बसवण्यासाठी आणखी केंद्र सुरू करण्याच्या सूचना वेंडर कंपनीला दिल्या आहेत. तसंच केंद्र बंद झाल्यामुळे तिथे नोंदणी केलेल्या वाहनधारकांना पुन्हा अर्ज करावा लागणार नाही. त्यांच्या सोयीनुसार 'एचएसआरपी' बसवण्यासाठी तारीख निश्चित केली जाईल असं पुणे प्रादेशिक परिवहन अधिकारी अर्चना गायकवाड यांनी सांगितलं.

**<u>बासरी परंपरा</u>**

जगविख्यात बासरीवादक पद्मविभूषण पंडित हरिप्रसाद चौरसिया यांचे ज्येष्ठ शिष्य आणि प्रसिद्ध बासरीवादक पंडित रूपक कुलकर्णी यांच्या संकल्पनेतून 'बांसुरी परंपरा' या अनोख्या सांगितीक महोत्सवाचं आयोजन करण्यात आलं आहे. महोत्सवात पद्मविभूषण पंडित हरिप्रसाद चौरसिया, रूपक कुलकर्णी यांच्यासह 80 शिष्यांचं बासरी सहवादन होणार आहे. हा महोत्सव उद्या 15 आणि रविवार, 16 मार्च ला सायंकाळी 6 वाजता द पुना वेस्टर्न क्लब, भूगाव, इथं होणार आहे. कार्यक्रम सर्वांसाठी खुला असल्याची माहिती पंडित रूपक कुलकर्णी आणि ब्लिसफुल विंड्स फाऊंडेशनचे मृगेंद्र मोहाडकर यांनी कळवली आहे.

<u>जर्मन</u>

जर्मन भाषा मराठीतून शिकता येण्यासारखं एक पुस्तक बालभारती नं जर्मन कोर्सबुक म्हणून नुकतंच प्रकाशित केलं आहे. यामध्ये मूलभूत जर्मन भाषा मराठीतून शिकता येणार असून कुतूहल म्हणून हे पुस्तक कुणालाही वाचता येईल. देवनागरी मधे जर्मन उच्चार देण्यात आले असून पुण्यातील डॉक्टर सविता केळकर आणि जर्मन भाषा तज्ञानी लोकांनी ह्या उपक्रमासाठी हातभार लावला आहे.

भूसंपादन

पुणे महापालिकेनं गेल्या नऊ वर्षांत टीडीआरपोटी २८५ एकर जागांचं भूसंपादन करून ताब्यात घेतली आहे. या जागांचं मूल्य तब्बल ९ हजार २४३ कोटी आहे. त्यामुळे महापालिकेचे भूसंपादनापोटी द्यावे लागणारे हजारो कोटी रुपये वाचले आहेत. यातून रस्ते, उद्याने, क्रीडांगणे, महापालिकेचे दवाखाने उभे राहिले असल्याची माहिती पुणे महापालिकेचे नगर अभियंता प्रशांत वाघमारे यांनी दिली.

<u>पिं चिं</u>

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या कर आकारणी आणि कर संकलन विभागाच्या वतीनं कर वसुलीची कार्यवाही सुरु असून सुट्टीच्या दिवशी कार्यालय सुरू राहणार आहे.

**<u>पिं चिं</u>**

स्वच्छ सर्वेक्षण २०२४'  ही स्पर्धा देशभरातून घेतली जात आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिका या स्पर्धेत सामील झाली आहे. यासाठी नागरिकांचे अभिप्राय महत्वाचे असून त्याला अतिरिक्त गुण देण्यात आले आहेत. त्यामुळे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेस देशात अव्वल स्थान मिळवून देण्यासाठी शहरातील प्रत्येक नागरिकानं आपला अभिप्राय देणं महत्त्वाचं असल्याचं पालिका आयुक्त शेखर सिंह यांनी सांगितलं आहे.

**<u>हवामान</u>**

पुणे आणि परिसरात आज कमाल तापमान 38 तर किमान तापमान 18 पूर्णांक 5 अंश सेल्सिअस नोंदवलं गेलं. उद्याही साधारण असंच तापमान राहील असा अंदाज पुणे वेधशाळेनं वर्तवला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविधभारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी 6 वाजता ताज्या पुणे वृत्तांत मध्ये, नमस्कार.**